# बृहन्मुंबई महानगरपालिका

**सहायक आयुक्त, 'सी' विभाग यांचे कार्यालय**

**७६, श्रीकांत पालेकर मार्ग, चंदनवाडी, मरीनलाईन्स, मुंबई - ४०० ००२**

क्र.सआ/सी /सहा.अभि.(घ.क.व्य.)/११४२३/दि. १४.१०.२०२४.

## स्वारस्य अभिव्यक्ती

सी विभागाच्या हदद्ीतील कुंभारवाडा येथील कचरा वर्गीकरण केंद्र चालविण्यासाठी विविध आस्थापनांवरील (सोसायटी, मार्केटस, जिमखाने इत्यादी.) जागेवर सुका व ओला कचरा वर्गीकरण करुन सुका कचरा स्वःखर्चाने वाहून नेण्याकरीता अनुभवी व पात्र खाली नमूद पात्रता असणा-या संस्थाकडून अर्ज मागवित आहे.

येथे असे सुचित करण्यात येते आहे की सदर कामासाठी ज्या संस्था इच्छुक असतील त्यांनी संस्थेच्या लेटर हेड वरती खालील बाबींची पुर्तता करुन सहाय्यक अभियंता (घ.क.व्य) सी विभाग यांच्या कार्यालयात सादर करावे.

१. विभागीय स्तरावर सुका कचरा वर्गीकरण केंद्रे चालविण्याबाबत अर्ज करणा-या संस्था हया शासन नोंदणीकृत कचरा वेचक संस्था / बचत गट म्हणून धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणीकृत असल्याची व सदर संस्थाचे सभासद हे कचरा वेचक असणे आवश्यक आहे.

२. सदर कचरा वेचक संस्था / बचत गट हे धर्मादाय आयुक्त याच्याकडे गेली ३ वर्षापासून (अर्ज सादर करण्याच्या दिनांका अगोदर) नोंदणीकृत असली पाहिजे.

३. सदर कचरा वेचक संस्था / बचत गट यांना घनकचरा व्यवस्थापन कामातील सुका कचरा संकलन / वर्गीकरण याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

४. कचरा वेचक संस्था / बचत गट यांनी त्यांच्याकडील नोंदणी असलेल्या कचरा वेचक सभासदांची यादी अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

५. सुका कचरा वर्गीकरण केंद्र चालविण्यास अर्ज करणारी संस्था ही कचरा वेचकांची संस्था म्हणून धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणीकृत असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

६. सदर संस्थेने विभागीय स्तरावर अर्ज करते वेळी अर्जासोबत त्यांनी संस्थेची उद्दिष्टे व ध्येयपूर्तीची कागदपत्रे / जाहीरनामा धर्मादाय आयुक्त यांना सादर केल्याबाबतची माहिती / पुरावा तसेच उद्दिष्टे व ध्येयपूर्ती यांची एक पत सादर करणे आवश्यक आहे.

७. इच्छुक संस्थेने मनपा हददीत किमान एक कचरा वर्गीकरण केंद्र चालवीत असल्याचा अनुभव व प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

८. सदर कामाकरीता संस्थेस बृहन्मुंबई महानगरपालिका मार्फत कुठल्याही प्रकाराचे अधिदान मिळणार नाही.

९. निवड झालेल्या संस्थेकडून सदर सुका कचरा वर्गीकरण केंद्राची देखभाली अन्वये सुरक्षा अनामत रक्कम म्हणून रु. १,००,०००/- जमा करण्यात येईल.

१०. अर्ज करण्याची अंतिम दिनांक २१.१०.२०२४ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत.

सही/-

**सहाय्यक आयुक्त 'सी' विभाग**